**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात ३३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत वृक्षारोपण

अमरावती.

महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जवळपास हजार रोपट्यांची लागवड करण्यात आली आहे. वृक्षलागवडीचा प्रारंभ प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांचे शुभहस्ते वृक्षलागवडीने करण्यात आला. यावेळी विद्यापीठ परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्र ते पदव्युत्तर मराठी विभागाच्या इमारती लगतच्या नाल्याच्या काठावर वृक्षारोपण करण्यात आले. विद्यापीठाचे शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर झालेल्या वृक्षलागवडीमध्ये आपला सहभाग दिला.

राज्यातील वृक्षाच्छादन वाढावे व त्या माध्यमातून हरित महाराष्ट्र ही संकल्पना साकार व्हावी, यादृष्टीने येत्या तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवड करण्याचा निर्धार महाराष्ट्र शासनाने केला आहे. विद्यापीठ परिसरामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आवाहनानुसार यापूर्वी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली असून जवळपास सर्वच वृक्ष जगले आहेत. वृक्षलागवड कार्यक्रमाला विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व शैक्षणिक विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम व त्यांचे विभागातील सहकारी यांनी वृक्षलागवड कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतलेत.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/०८/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 211